**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १९९/२०१२</u>**

गुरुनाथ जोशी विरुध्द संजय जोशी व इतर.

## निशाणी ५२ खालील आदेश

प्रतिवादी क्र.१ तर्फे सदर अर्ज ऊस बिल स्थगितीसाठी दाखल केला आहे. वादीने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ चे अर्जातील कथन असे की, दावा मिळकत गट नं.९२ ही वादी व प्रतिवादी यांची वडीलार्जित मिळकत असुन दावा मिळकत त्यांच्यात सामाईक हिश्श्याने कब्जे वहीवाटीस आहे. प्रतिवादी क्र.१ गरीब स्वभावाचा असल्यामुळे व तो त्याची वयस्कर आई म्हणजे प्रतिवादी क्र.२ चा सांभाळ करतो. सदर परिस्थीतीचा गैरफायदा घेऊन वादी याने दत्त साखर कारखाना, शिरोळ येथील अधिका–यांशी संगणमत करुन गट नं.९२ मधील ऊस पिक सन २०२१–२०२२ या गळीत हंगामाकरिता दि.२४/०१/२०२२ ते दि.३०/०१/२०२२ या कालावधीत दांडगाव्याने तोडुन दत्त साखर कारखाना, शिरोळ येथे घातला आहे. सदर ऊस बिलाची रक्कम न्यायालयाचा पुढील हुकुम होईपर्यंत वादीला अदा करु नये किंवा त्याच्या सोसायटी अथवा कर्ज खात्यास जमा करु नये असा आदेश कारखान्यास व्हावा अशी विनंती प्रतिवादी क्र.१ ने केली आहे.

३. सदर अर्जाला वादीने निशाणी ५७ ला म्हणणे दाखल केले आहे. वादीने म्हणणे असे की, प्रतिवादी मागत असलेली दाद प्रामाणिकपणाची व न्यायाची नाही. वादी व प्रतिवादी क्र.१ हे आपापल्या सोयीनुसार जमिन कसत आहेत व नृसिंहवाडी येथील दावा मिळकत गट नं.९२ ही मिळकत वादी कसत आहे. तसेच कुरुंदवाड हद्दीतील दावा मिळकत गट नं.४२५ ही मिळकत व उर्वरी सर्व मिळकती प्रतिवादी क्र.१ कसत आहेत व त्यांच्या कब्जे वहीवाटीस आहेत. गट नं.९२ मध्ये वादीची एकटयाची कब्जे वहीवाट असुन तो अनेक वर्षापासुन तेथे पिक घेत आहे. सदर पिकाकरिता वादीने सोसायटी तसेच बँकाकडुन कर्ज घेतले आहे व कर्ज काढुन खते व बी–बीयाने घेऊन मशागत केली आहे. तसेच वादी पाणीपट्टी व मोटारपंपचे बिलही भरत आहेत. प्रतिवादी क्र.१ ने त्याच्या कब्जे वहीवाटीस असलेल्या गट

नं.४२५ मधील पिकाबाबतची माहिती लपवुन ठेवली आहे. गट नं.९२ मधील ऊस पिक प्रतिवादी क्र.१ ने केले आहे, असे प्रतिवादी क्र.१ चे कथन नाही. तसेच प्रतिवादी क्र.१ ने गट नं.९२ मधील ऊस पिकाकरीता कोठुन बी–बीयाणे तसेच पाणी घेतले याबाबत कथन केलेले नाही. प्रतिवादी क्र.१ ने गट नं.९२ मधील पिकाकरिता कष्ट–मशागत व पैसा खर्च केलेला नाही व गट नं.९२ मधील ऊस पिकाशी त्याचा संबंध नाही. प्रतिवादी क्र.१ चा अर्ज मंजुर झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. तसेच वादी यांनी काढलेले सोसायटी व बँकेचे कर्ज भरणे त्यांना अशक्य होणार आहे व स्वतःच्या कुटुंबाचा खर्च चालविणेही अशक्य होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ चा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती वादीने केली आहे.

४. प्रस्तुत अर्जाबाबत दत्त साखर कारखाना, शिरोळ यांचे म्हणणे मागविले असता त्यांनी निशाणी ५६ ला म्हणणे देवुन असे कळविले आहे की, दावा मिळकत गट नं.९२ मधील ६४.८३९ टन इतका ऊस वादी यांच्या नावे गाळपासाठी सन २०२१–२०२२ मध्ये त्यांच्या कारखान्याला आलेला आहे व सदर ऊसाचे बिल रु.१,८९,३२९/– इतके असुन त्यापैकी रु.७,४१५/– इतकी रक्कम कारखाना येणेबाकी वसुल होणार असुन राहीलेली रक्कम रु.१,८१,९१४/– ही वादीला दि.१४/०२/२०२२ रोजी अदा होईल.

५. वादीतर्फे वकील श्री.आर.जे.गोरवाडे व प्रतिवादीतर्फे वकील श्री.एम.एस.जाधव यांचा युक्तीवाद ऐकला. वादीने निशाणी ५५ सोबत कागदपत्रे दाखल केली आहेत. त्यामध्ये ऊस वजन पावत्या तसेच पार्श्व कृषी सेवा केंद्र यांच्याकडील खरेदी पावत्या तसेच मोटार पंपाची पावती व विज बिल भरलेली पावती असे कागदपत्र दाखल केले आहेत. सदर ऊस बिल पावत्यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीच्या नावे दावा मिळकत गट नं.९२ मधुन सन २०१३ तसेच सन २०१६-२०१७ तसेच सन २०१८, सन २०२० या काळात दत्त साखर कारखाना, शिरोळ येथे ऊस गेला आहे. सदर ऊस वजन पावत्यांवर दावा मिळकत गट नं.९२ व ऊस मालकाचे नाव म्हणुन वादीच्या नावाची नोंद दिसुन येते. तसेच वादीच्या नावे पार्श्व कृषी सेवा केंद्र, गौरवाड यांच्याकडुन वेळोवेळी बी-बीयाणे तसेच खते खरेदी

केल्याबाबतच्या पावत्या दिसुन येतात. प्रतिवादीच्या नावे अशी कोणतीही ऊस बिल पावती दिसुन येत नाही, जेणेकरुन प्रतिवादी क्र.१ ने गट नं.९२ मध्ये ऊस पिक केले आहे व सदर ऊसाचे पिक करण्यासाठी खर्च केला आहे असे दिसुन येईल. गट नं.९२ मध्ये प्रतिवादी क्र.१ ने ऊसाचे पिक केले असे प्रतिवादी क्र.१ ने कुठेही म्हटले नाही. दाखल कागदपत्रांवरुन दावा मिळकत गट नं.९२ मध्ये वादीने ऊसाचे पिक केले आहे असे प्रथमदर्शनी दिसुन येते. याशिवाय दावा मिळकत गट नं.९२ मधील गेलेल्या ऊसाचे बिल स्थगित ठेवल्यास वादीला नाहक नुकसान सोसावे लागेल. वादीने गट नं.९२ मध्ये ऊस पिक करण्यासाठी केलेला खर्च भरुन काढण्यासाठी सदर ऊस बिलाची रक्कम वादीला मिळणे योग्य व न्याय्य होईल. सदर ऊस बिल स्थगित ठेवल्यास वादीला त्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करता येणार नाही. त्यामुळे वादी व त्याच्या कुटुंबाचे हाल होऊ शकते. त्यामुळे सद्य परिस्थीत ऊस बिल स्थगित ठेवुन वादीचे नुकसान करणे योग्य होणार नाही. सबब मी सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते :–

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. सदरचा आदेश दत्त साखर कारखाना, शिरोळ या कारखान्यास कळवावा.

(शलाका एस. जांभळे)

दिनांक – ११.०२.२०२२ — दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कुरुंदवाड